R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १०४

दि.०४ एप्रिल २०२६,वार: शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करुया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वसतिगृहांची उभारणी करण्यात येत आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे.

या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिध्दी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले.

बैठकीत मुंबई महापालिकेच्यावतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

## धिरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त पोहरेगाव येथे सोमवारी मोफत कर्करोग निदान शिबिर




रेणापूर (प्रतिनिधी) : लातूर ग्रामीणचे युवा नेते, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार मा. धिरजभैय्या विलासरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पोहरेगाव जिल्हा परिषद गटात भव्य 'मोफत कर्करोग (कॅन्सर) निदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत पोहरेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबिर पार पडणार आहे.

लातूर जिल्हा परिषद सदस्या सौ. मनिषा गंगासिंह कदम यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात 'गडदे हॉस्पिटल अँड कॅन्सर केअर'चे तज्ज्ञ डॉक्टर एच. एस. गडदे रुग्णांची मोफत तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. कर्करोग हा आजार वेळेत ओळखल्यास त्यावर प्रभावी उपचार करणे शक्य असते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरात प्रामुख्याने तोंडात न बरे होणारे व्रण, शरीरावर किंवा स्त्रियांच्या बाबतीत स्तनांमध्ये जाणवणारी गाठ, अन्न गिळताना होणारा त्रास, सततचा खोकला, आवाजातील बदल, चामखीळ किंवा तिळाच्या रंगात होणारा बदल, तसेच महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध तक्रारींचे निदान केले जाणार आहे. पोहरेगाव गटातील सर्व पुरुष व महिलांनी, मग लक्षणे असोत वा नसोत, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजक सौ. मनिषा कदम यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनात आदरांजली



मुंबई : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

याप्रसंगी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, उप सचिव विजय कोमटवार, उप सभापती यांचे खाजगी सचिव आविनाश रणखांब, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक निलेश मदाने यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

## संपादकीय...

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव: आरोग्य समृद्ध महाराष्ट्राची लोकचळवळ

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे सहभागी झाले होते. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब-'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

दोन ते पाच कोटींचे पुरस्कार-राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

# धम्मध्वजाचा सन्मान की बाजारपेठेचा अतिक्रमण? - 'पंचशील' साडी वादाचे वास्तव

भारतीय समाजात प्रतीकांचे स्थान केवळ सजावटीपुरते मर्यादित नाही; ती आपल्या सामूहिक चेतनेची, इतिहासाची आणि मूल्यव्यवस्थेची जिवंत प्रतीके आहेत. ध्वज, चिन्हे, रंग आणि प्रतिमा या केवळ दृश्य गोष्टी नसून त्या एका विचारप्रवाहाचे प्रतिनिधित्व करतात. अशाच एका गंभीर प्रश्नाने आज समाजात डोके वर काढले आहे. पंचशील धम्मध्वज साड्यांवर छापण्याचा वाढता ट्रेंड. हा केवळ फॅशनचा भाग आहे का, की आपल्या मूल्यांच्या नकळत होत असलेल्या अवमूल्यनाची ही सुरुवात आहे? पंचशील धम्मध्वज हा केवळ पाच रंगांचा पट्टा नाही. तो भगवान बुद्धांच्या करुणा, समता, अहिंसा आणि प्रज्ञेच्या तत्त्वज्ञानाचा दृश्यमान आविष्कार आहे. निळा करुणेचा, पिवळा मध्यममार्गाचा, लाल शक्तीचा, पांढरा शुद्धतेचा आणि नारंगी प्रज्ञेचा संदेश देतो. या रंगांची मांडणी म्हणजे एक जिवंत तत्त्वज्ञानच आहे. म्हणूनच हा ध्वज केवळ सजावटीचा भाग नसून तो आदर, श्रद्धा आणि सन्मानाने जपण्याचा विषय आहे.

मात्र, आजच्या बाजारपेठेने या पवित्र प्रतीकाला 'डिझाईन एलिमेंट'मध्ये रूपांतरित केले आहे. साड्या, टी-शर्ट्स, मोबाईल कव्हर्स, बॅग्स जिथे नजर जाईल तिथे पंचशील रंगांचे व्यावसायिकीकरण दिसून येते. येथे प्रश्न फक्त वापराचा नाही, तर वस्तूकरणाचा आहे. श्रद्धा आणि तत्त्वज्ञान यांना बाजारात मांडून विक्रीयोग्य उत्पादन बनवणे ही केवळ व्यावसायिक चतुराई आहे की सांस्कृतिक असंवेदनशीलता? काहीजण याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रूप देतात. धम्मध्वजाचा प्रसार होतोय, मग यात गैर काय? असा युक्तिवाद मांडला जातो. परंतु, प्रसार आणि वापर यात मूलभूत फरक आहे. सन्मानाने ध्वज फडकवणे आणि तो परिधान करून दैनंदिन वापरात झिजवणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. साडी ही वस्त्र आहे ती



धुतली जाते, जमिनीला स्पर्श करते, अनेकदा अनाहूत परिस्थितींना सामोरी जाते. अशा वस्त्रावर धम्मध्वजाचे प्रतीक वापरणे हे नकळत त्याच्या पावित्र्यावर गदा आणणारे ठरू शकते.

आपण राष्ट्रीय ध्वजाबाबत किती जागरूक आणि संवेदनशील आहोत, हे सर्वश्रुत आहे. तिरंग्याच्या वापराबाबत स्पष्ट नियम आणि मर्यादा आहेत. कारण तो राष्ट्राच्या अस्मितेचा प्रतीक आहे. मग पंचशील धम्मध्वज, जो लाखो लोकांच्या श्रद्धेचा आणि तत्त्वज्ञानाचा आधार आहे, त्याच्याबाबत तशीच संवेदनशीलता अपेक्षित असणे चुकीचे ठरेल का? येथे बाजारपेठेचा हस्तक्षेप सर्वात चिंताजनक ठरतो. आजच्या युगात प्रत्येक गोष्ट 'प्रॉडक्ट' बनवली जाते. धार्मिक प्रतीके, सांस्कृतिक ओळखी आणि अगदी भावना देखील 'ब्रँड'मध्ये परिवर्तित होत आहेत. धम्मध्वज साडी ही त्याच प्रक्रियेची उपज आहे. लोकांच्या श्रद्धेचा वापर करून नफा कमावण्याचा हा प्रयत्न कितपत नैतिक आहे? हा प्रश्न समाजाने विचारायलाच हवा.

दुसरीकडे, प्रतीकांना मर्यादा घातल्यामुळे त्यांचा प्रसार थांबतो असा एक युक्तिवादही पुढे येतो. हा मुद्दा पूर्णपणे फेटाळता येत नाही. परंतु, प्रसार आणि विकृतीकरण यामध्ये एक सूक्ष्म रेषा आहे. प्रसाराच्या नावाखाली जर मूळ तत्त्वज्ञानच हरवले, तर तो प्रसार निरर्थक ठरतो. बुद्धांची शिकवण ही अंतर्मुखतेची आहे, बाह्य दिखाव्याची नाही. मग त्यांच्या विचारांचे प्रतीक बाह्य आकर्षणासाठी वापरणे हीच त्या शिकवणीची विटंबना ठरत नाही का? या पार्श्वभूमीवर समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. बंदी हा उपाय नाही; पण विवेक जागवणे हा उपाय नक्कीच आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या सदसद्विवेकबुद्धीने ठरवले पाहिजे की, आपण कोणत्या प्रतीकांचा सन्मान कसा राखणार आहोत. ही केवळ वैयक्तिक निवड नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे.

धार्मिक व सामाजिक संघटनांनीही या विषयावर स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. केवळ निषेध करून थांबणे पुरेसे नाही, तर जनजागृती करणे, योग्य मार्गदर्शन करणे आणि प्रतीकांचा सन्मान राखण्याचे पर्याय सुचवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, शासनानेही अशा संवेदनशील प्रतीकांबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा विचार करणे गरजेचे आहे. शेवटी, हा वाद केवळ साडी वापरायची की नाही इतकाच मर्यादित नाही. हा आपल्या मूल्यांचा, संवेदनशीलतेचा आणि सांस्कृतिक जबाबदारीचा प्रश्न आहे. आज धम्मध्वज आहे; उद्या कदाचित इतर प्रतीकांचीही अशीच अवस्था होऊ शकते. प्रश्न एकच आहे, आपण बाजारपेठेच्या मोहात अडकून आपल्या मूल्यांचे वस्तूकरण स्वीकारणार आहोत का, की त्या मूल्यांचे रक्षण करणार आहोत? धम्मध्वज हा रंगांचा संगम नाही; तो एक विचार आहे, एक जीवनमार्ग आहे. आणि त्या मार्गाचा सन्मान राखणे हेच खरे बुद्धांना अभिवादन ठरेल. अन्यथा, उद्या आपल्या श्रद्धाही 'सेल'मध्ये लागलेल्या दिसतील, आणि तेव्हा निषेध करण्यासाठी उरलेले काहीच नसेल.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६ २०९१९**

# श्री तुकारामजी मुंढे यांची वारंवार बदली ही राज्याच्या जनतेसाठी धक्कादायक बाब.

मुंढे नावाच वादळ सरकारच्या काणात नेहमीच घोंगावत असते. जनुकाय मुंढे साहेब भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांच्या स्वप्नात येतात व त्यांच्या मानगुटीवर बसतात की काय असे वाटत आहे.मुंढेनी सर्जीकल स्ट्राईक केला की,सरकारची आणि भ्रष्ट राजकीय पुढारी व भ्रष्ट अधिकाऱ्यांची घाबरगुंडी नेहमीच का उडत असते असे का? या घटनांवरून स्पष्ट होते की, राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे रॅकेट आजही जिवंत आहे.राज्यात सर्व काही सुरळीत चालू असतांना सनदी (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या वारंवार का होतात? हा मोठा प्रश्न राज्याच्या १३ कोटी जनतेपुढे वारंवार उपस्थित होतो. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना वाटते की,हे राज्यात चाल्लय तरी काय!राज्यात अनेक कर्तव्यनिष्ठ अधिकारी आहेत आणि या अधिकाऱ्यांचा लाभ गरीब व सर्वसामान्यांना झाला असून मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची पोलखोल झाली आहे व त्यांच्या मुसक्या सुध्दा आवळल्या आहे.एवढ काही सुरळीत सुरू असतांना दिनांक ३१ मार्च २०२६ मंगळवारला राज्य प्रशासनात मोठे फेरबदल करत तब्बल दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. अचानक बदल्यांचे आदेश होत असेल तर राज्याचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये नामवंत दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचा समावेश आहे ही राज्याच्या दृष्टीने धक्कादायक आणि गंभीर बाब आहे. आश्चर्याची बाब म्हणजे गेल्या २१ वर्षातील मुंढे यांची ही २५ वी बदली असल्याचे सांगितले जाते.गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागात बदली झाली होती.२१ वर्षांत २५ बदल्या म्हणजे सरासरी त्यांचा प्रत्येक विभागाचा कार्यकाळ अल्पसा रहाला.यावरून स्पष्ट होते की, सरकार कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांना आपले काम सुध्दा इमानदारीने करू देत नाही ही बाब नुकत्याच झालेल्या (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून स्पष्ट होते. बदल्यांच्या कारणांची पडताळणी सरकार का करीत नाही? आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांचा कार्यकाळ अपुरा ठेवून वाटेल तेव्हा बदली करण्यात येते अशा परिस्थितीत अधिकारी वर्ग भ्रष्टाचारावर नियंत्रण कसे काय ठेवेल! बदलीसाठी सरकारजवळ नियम किंवा काहीच लिमिट किंवा अटी नाहीत का? केव्हाही बदली करणे ही बाब कोणत्या नियमात बसते, असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.सन्माननीय तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्ती होताच त्यांनी संपूर्ण विभागाला धारेवर धरले व सर्व काळ्या चिठ्ठ्या बाहेर काढल्या व दिव्यांग कल्याण विभाग सुरळीत करण्याला सुरुवात केली. परंतु सरकारने अचानक बदल्यांचा भडीमार केल्याने सर्वसामान्यांचे मन दुखावले आहे.सरकारने ज्या दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत त्या जनकल्याणाच्या प्रती नसाव्यात असे मला वाटते.यात सरकारने आपली पोळी शेकण्यासाठी बदल्या केल्या असाव्यात अशी शंका महाराष्ट्राची सर्वसामान्य जनता वर्तवीत आहे.धडाकेबाज निर्णयासाठी प्रसिद्ध असलेले तुकाराम मुंढे यांची वारंवार बदली करून सरकार काय सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब अजूनपर्यंत सर्वसामान्य जनतेला समजु शकली नाही. आतातर २१ वर्षांत फक्त २५ बदल्या झाल्यात पुढे चालून ते भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांना घाम सोडू शकते त्यामुळे त्यांच्या निवृत्तीच्या काळापर्यंत अंदाजे २०३५ पर्यंत बदलीची सेंच्युरी होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.कारण मुंढे सारख्यांचे धाडसी कार्य कोणत्याही सरकारला पचणारे नाही.त्यामुळे कोर्ट कचेरीमध्ये ज्याप्रमाणे तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू असतो त्याचप्रमाणे मुंढे सारख्यां कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची बदली पे बदली असा सरकारकडून लपंडाव सुरूच राहिल ही बाब स्पष्ट होते.शेवटी हाही सरकारचा रेकॉर्ड ग्रीनीज बुकमध्ये नोंदवीला जाऊ शकतो. तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण मधील अनेक गैरप्रकार समोर आणले असतांना त्यांची बदली झाली.त्यामुळे या गैरप्रकारांवर पांघरूण घालण्यासाठी मुंढेची बदली करण्यात आली आहे ही बाब स्पष्ट होते.आता मुंढेची बदली आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव या पदावर मंत्रालयात करण्यात आली आहे.याठीकाणीतरी सरकारने मुंढे साहेबांना आपल्या पध्दतीने काम करू द्यावे अशी सरकारकडून सर्वसामान्यांना अपेक्षा आहे.अन्यथा सर्वसामान्यांचा विश्वास सरकारवरून उठेल.मुंढे यांचा सर्वीस काळ अंदाजे २०३५ पर्यंत आहे मग २०३५ पर्यंत सरकार असाच लपंडाव खेळणार काय असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.या लेखाव्दारे सरकारला विनंती करतो की, सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निश्चित कार्यकाळ ठरवावा व त्यानुसारच बदलीचे पाऊल उचलालेत जेणेकरून त्यांना आपले काम पुर्ण करण्याची संधी मिळेल.त्याचप्रमाणे सन्माननीय महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना विनंती करतो की, आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन बदल्यांच्या संदर्भात राज्य सरकारला ठोस नियमावली व अटींची जाणीव करून द्यावी जेणेकरून आयएएस अधिकारी आपला कार्यकाळ पूर्ण करून सर्वसामान्यांना दिलासा देऊ शकेल व राज्य सरकारची बदलीच्या सिलसिल्यावर अंकुश लागेल.सन्माननीय तुकाराम मुंढे यांच्या कार्याला माझा सलाम. जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.**

# लेकीच्या जन्माचा आनंद, गरजूंना ज्ञानाचा प्रकाश

लातूर : सामाजिक जाणीवेचा सुंदर संदेश देणारी एक हृदयस्पर्शी घटना नुकतीच घडली. सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या घरी नवजात मुलीचा जन्म झाला आणि या आनंददायी क्षणाला त्यांनी समाजोपयोगी वळण देत अनोख्या पद्धतीने साजरा केला. खुशीग्राम फाउंडेशनमधील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांनी आपल्या मुलीच्या जन्माचा आनंद समाजासोबत वाटला.



वैष्णवी इंडॉस्कॉपी हॉस्पिटल येथे पार पडलेल्या या उपक्रमात वही, पेन, पुस्तके तसेच स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या अशा आवश्यक शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. या प्रसंगी डॉ. राजेश दरडे, डॉ. वर्षा दरडे, संपादक दत्तात्रय परळकर, खुशीग्रामचे संचालक मधुकर सोनवणे यांची उपस्थिती लाभली. तसेच नवजात बालिका आणि तिची आई सावित्री संजय राजुळे यांचाही या प्रसंगी विशेष सहभाग होता.

विशेष म्हणजे, ही गोंडस बालिका रामभक्त हनुमान जयंतीच्या पवित्र दिवशी, गुरुवारी जन्माला आली. त्यामुळे या आनंदोत्सवाला एक धार्मिक आणि सांस्कृतिक अधोरेखितही लाभले.

संजय राजुळे यांनी आपल्या मुलीच्या जन्माचा आनंद केवळ कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू मुलांपर्यंत पोहोचवला. त्यांच्या या उपक्रमातून खरा आनंद तोच, जो इतरांसोबत वाटला जातो हा संदेश अधोरेखित झाला. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नवसाला पावणाऱ्या शिवलीच्या श्री हनुमान यात्रेला उत्साहात प्रारंभ; शतकानुशतके तेवत असलेला दिवा भक्तांसाठी श्रद्धेचा केंद्रबिंदू

लातूर -- औसा तालुक्यातील शिवली या पवित्र भूमीत नवसाला पावणाऱ्या श्री हनुमान यात्रेला यंदा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्याच्या सीमेवरील हे जागृत देवस्थान आज हजारो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले असून यात्रेच्या निमित्ताने पंचक्रोशीतील तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची मोठी गर्दी उसळलेली दिसत आहे.

औसा तालुक्यातील शिवली येथील श्री हनुमान मंदिराची सर्वात मोठी वैशिष्ट्य म्हणजे येथे गेल्या शंभर-दोनशे वर्षांपासून अखंड तेवत असलेला दिवा. काळाच्या ओघात अनेक बदल झाले, पण हा दिवा आजही तसाच अखंड प्रज्वलित आहे. या दिव्यामुळेच या यात्रेला एक वेगळीच पवित्रता आणि ख्याती लाभली आहे. नवसाला पावणारा हनुमान म्हणून या देवस्थानाची ख्याती सर्वदूर पसरली असून भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि नवस फेडण्यासाठी मोठ्या श्रद्धेने येथे येतात.

दरवर्षी हनुमान जयंतीनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारपासून यात्रेला सुरुवात



होते. परंपरेनुसार, पहाटे गावातील भाविक आपल्या घरापासून मंदिरापर्यंत दंडवत घालत येतात. पहाटे ४ वाजल्यापासून दुपारी १२ वाजेपर्यंत दही-दुधाचा अभिषेक करण्यात येतो. त्यानंतर श्री हनुमानाच्या मूर्तीला सोन्या-चांदीच्या अलंकारांनी सजवून महापूजा केली जाते.

दुपारनंतर गावातील तसेच सासरी गेलेल्या महिला आपल्या माहेरच्या आठवणींनी भारावून वाजत-गाजत मंदिराकडे येतात आणि लोटांगण घालून आपल्या श्रद्धेची प्रचिती देतात. दिवसभर मंदिर परिसर भक्तांनी गजबजलेला असतो, आणि वातावरणात भक्तिभाव, नामस्मरण आणि आनंदाची लहर पसरलेली असते.

यात्रेच्या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

४ एप्रिल रोजी पहाटे २ वाजल्यापासून दंडवत, सकाळी अभिषेक, अलंकार व महापूजा, सायंकाळी प्रसाद वितरण आणि रात्री हरिजागर व भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

५ एप्रिल रोजी भव्य भारूड कार्यक्रम, ६ एप्रिल रोजी मल्लांचा कुस्तीचा थरार आणि सायंकाळी भक्तिमय श्री लक्ष्मण शक्ती सोहळा पार पडणार आहे.

तर ७ एप्रिल रोजी श्रीरामायणाची महाआरती व सर्व भाविकांसाठी महाप्रसाद देऊन यात्रेची सांगता होणार आहे.

शिवलीची ही यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. अखंड तेवत असलेला दिवा आणि भक्तांच्या ओसंडून वाहणाऱ्या भावनांमुळे ही यात्रा प्रत्येकाच्या मनात विशेष स्थान निर्माण करते.

# मित्र सहयोग, ठाणे यांची 'अनोळखी' ठरली सर्वोत्कृष्ट उत्तरार्ध एकांकिका

ठाणे – गडकरी रंगायतन, ठाणे येथे २ एप्रिल २०२६ रोजी उत्तरार्ध एकांकिका स्पर्धा २०२६ ची अंतिम फेरी पार पडली. पन्नाशी पार केलेल्या तरुणांच्या सळसळत्या उत्साहात दमदार पाच एकांकिका सादर झाल्या. त्यापैकी मित्र सहयोग, ठाणे यांच्या 'अनोळखी' या एकांकिकेने सर्वोत्कृष्ट उत्तरार्ध एकांकिका हा प्रथम पुरस्कार पटकावला. रंगा थिएटर्स, ठाणे यांच्या 'तरणाई' ने द्वितीय, तर ठाणे आर्ट गिल्ड यांच्या 'ती येते आणि जाते' या एकांकिकेने तृतीय पारितोषिक पटकावले.



सॉफ्ट कॉर्नर प्रस्तुत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, ठाणे शाखेच्या सहकार्याने आणि मोरया इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंट यांच्या आयोजनाने ही स्पर्धा अतिशय उत्तमरीत्या पार पडली.

स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी लेखक-दिग्दर्शक विनोद जाधव, अभिनेता संदीप रेडकर आणि अभिनेत्री योगिनी चौक हे परीक्षक म्हणून लाभले होते. तसेच लेखक-दिग्दर्शक विशाल कदम, दिग्दर्शक अनिल बांदिवडेकर, अभिनेत्री शीतल कुलकर्णी-रेडकर, ज्येष्ठ अभिनेत्री संजीवनी समेळ, अभिनेत्री संपदा जोगळेकर, नाट्य परिषद, ठाणे शाखेचे पदाधिकारी नरेंद्र बेडेकर, विद्याधर ठाणेकर, सॉफ्ट कॉर्नरचे एमडी व सीईओ दिलीप कुलकर्णी आणि मिसेस कुलकर्णी यांच्यासह ठाण्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पन्नाशी पार केलेल्या स्पर्धकांचा उत्साह आणि उत्तम विषयांची निवड करून केलेली सादरीकरणे पाहून उपस्थित मान्यवर, परीक्षक आणि पाहुण्यांनी समाधान व्यक्त केले. अंतिम फेरी पाहण्यासाठी प्रेक्षकांनीही मोठी गर्दी केली होती.

ठाणे, पालघर, नवी मुंबई, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, चिपळूण आणि मुंबई अशा विविध ठिकाणांहून स्पर्धक संघांनी दिलेल्या उत्तम प्रतिसादाबद्दल आयोजक मोरया इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंटचे प्रमुख प्रफुल्ल गायकवाड यांनी समाधान व्यक्त केले. तसेच प्रेक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आभार मानले. सोबतच, दरवर्षी स्पर्धेला असाच उत्तम प्रतिसाद मिळत राहावा आणि प्रेक्षकांची उपस्थिती वाढत राहावी, अशी आशा व्यक्त केली.

# सत्ताधाजयांची निष्क्रीयता आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकर पाण्यापासून वंचित

लातूर/प्रतिनिधी : काही महिन्यांपूर्वीच लातूर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांनी लातूरकरांना २४ तास व सात दिवस शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला भुलून लातूरकरांनी मनपाची सत्ता काँग्रेसच्या हाती दिली. मात्र सत्ता हाती येताच लातूरकरांना वाजयावर सोडण्याचे काम आ. अमित देशमुख यांनी केले आहे. सत्ताधाजयांच्या निष्क्रियतेमुळे आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकरांना गेल्या चार दिवसांपासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागल्याचा आरोप नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शितल मालू यांनी केला आहे. लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळीत होवून शुद्ध पाणी लातूरकरांना न मिळाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शितल मालू यांनी दिला आहे.



लातूरकरांनी लातूर मनपा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत करोडो रुपयांचा कर भरला असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे यावर्षीतर विक्रमी कर वसूली झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगितले आहे. या करवसुलीतून आलेल्या पैशातून लातूरकरांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे आठवण करून देत शितल मालू यांनी या पैशाच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याचे वीजबिल का अदा करण्यात आले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. प्रशासनाचे उदासिन धोरण आणि त्याला मिळणारी सत्ताधाजयांची निष्क्रियतेची साथ यामुळे लातूरकरांना धरणात पाणी असूनही पाण्यापासून वंचित रहावे, लागत आहे. मनपा निवडणुक प्रचारादरम्यान मोठ मोठी आश्वासने देणारे शहराचे आमदार तथा काँग्रेस नेते अमित देशमुख यांनाही लातूरकरांशी काहीच देणे घेणे नसल्याचे या माध्यमातून पुन्हा एकदा समोर आले आहे. आ. देशमुख यांनी या प्रकरणी लक्ष घालून महापौर व त्यांच्या टीमला सूचना दिल्या असत्या तर लातूरच्या पाणीपुरवठ्याची वीज खंडीत झाली नसती असा आरोपही शितल मालू यांनी केलेला आहे.

पाण्याच्या राजकारण करून निवडणुका नेहमीच लढविणाजया काँग्रेसच्या मंडळींना इशारा देत शितल मालू यांनी लवकरात लवकर लातूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होवून नागरिकांना शुद्ध पाणी मिळाले नाही तर तिव्र आंदोलन करण्यात येईल, असेही स्पष्ट केले आहे.

# ठाणे जिल्ह्यात डिझेल विक्रीवरील निर्बंध शिथिल; जिल्हाधिकाऱ्यांचे सुधारित आदेश

ठाणे (जिमाका)-* समाज माध्यमांवर डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरलेल्या बातम्यांनंतर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लावलेले निर्बंध आता शिथिल करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील इंधन पुरवठा आणि वितरणाची परिस्थिती पूर्वपदावर आल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने २७ मार्च २०२६ च्या मूळ आदेशात अंशतः बदल करून नवीन सुधारित आदेश जारी केले आहेत.

या सुधारित आदेशानुसार, डिझेल पंप मालकांनी आता डिझेलचे वितरण पूर्वीप्रमाणेच करावे. मात्र, कोणत्याही कंपनी किंवा व्यक्तीकडून गरजेपेक्षा जास्त डिझेलची उचल होणार नाही, याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, वाहनांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी नेल्या जाणाऱ्या डिझेलच्या नोंदी अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

याचबरोबर डिझेलचा अनधिकृत साठा करणाऱ्यांविरुद्ध 'जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५' नुसार कारवाई केली जाईल. तसेच,या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

हे आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आले आहेत,असेही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्पष्ट केले आहे.

# केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका पादचारी महिलेला भरधाव ट्रकने चिरडले!

केज/प्रतिनिधी –केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका पादचारी महिलेला भरधाव ट्रकने चिरडले असून अपघातातील महिलेचे दोन्ही पाय चुराडा झाले आहेत, तर फासळ्याही मोडल्या असल्याचे कळाले आहे.तर या अपघातातील जखमी महिलेची प्रकृती मात्र चिंताजनक असल्याचे कळाले आहे.

प्राथमिक मिळालेली माहिती अशी की, शितल सोमनाथ देशमाने वय ३५ वर्षे रा. महात्मा फुले नगर केज येथील रहिवासी आहेत. दि.३ एप्रील २०२६ शुक्रवार रोजी ६-०० वाजण्याच्या सुमारास शितल देशमाने या मंगळवार पेठ येथून बाजार करून शहरातील केज बीड या मुख्य रस्त्यावरून पायी चालत येत असताना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता ओलांडत असताना टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम.एच.१६ ए ई-८१५९ या ट्रकने भरधाव वेगाने येऊन महिलेला चिरडले आहे. या ट्रकचा चालक प्रकाश बागील वय ४५ वर्षे रा. मध्य प्रदेश असे नाव आहे. सदर ट्रक हा बीड जिल्ह्यातील आष्टी येथील काकडे पाटील यांचा आहे असे ट्रक चालक यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने



हे त्यांच्या सहकार्या समवेत घटनास्थळी दाखल झाले. भ्रमणध्वनी वरून १०८ नंबरला संपर्क करून रुग्णवाहिकेला तात्काळ घटनास्थळी पाचारण करण्यात करण्यात आले. शितल देशमाने यांना उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचारासाठी हलवण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय येथे प्रथमोपचार करून सदर घटनेतील महिलेची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे पुढील उपचारासाठी आंबेजोगाई येथे स्वामी रामानंद तीर्थ, मेडिकल कॉलेज येथे हलवण्यात आले आहे. सदरचा ट्रक हा परळी येथून सिमेंट घेऊन केज शहरातून नांदुर घाट येथे जात असताना केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सदर अपघात घडला आहे. यामध्ये शितल देशमाने यांना सदर ट्रकने किन्नर साईटच्या बाजूने ट्रकचे पुढील टायरने चिरडले आहे. यामध्ये शितल देशमाने यांचे दोन्हीही पाय गुडघ्यापासून वरती निकामी झाले आहेत. तर त्यांच्या छातीच्या फासळ्या देखील मोडलेल्या असल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. केज शहरात सतत अपघाताची मालिका सुरुच असून याला कारण असे आहे की, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात मध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असून मुख्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयाच्या समोरील परिसरात मुख्य रस्त्यावर अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या उभ्या वाहनांच्या रांगा या अपघाताचे मुख्य कारण ठरत आहेत. मात्र वाहतूक पोलीस या वाहानचालकांना काहीच न बोलता सायरन वाजवत पुढे निघून जातात. त्यामुळे ही अवैध वाहतूक नेमकी कशी चालते. अशी चर्चा नागरीकातुन ऐकावयास मिळत आहे. त्यामुळे वाहतूक पोलीस आता तरी या अवैद्य वाहनावर कारवाई करणार का? असा सवाल घटनास्थळी असलेल्या नागरिकांतून ऐकण्यास मिळाला. अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्यांना नेमके अभय कोणाचे आहे? अशी चर्चा उपस्थित नागरिकांतून केली जात होती.

सदरील ट्रक व ट्रकचा चालक हा केज पोलिसाच्या स्वाधीन आहे सदर घटनेचा पुढील तपास हा केज पोलीस हे करत आहेत.

# चळवळी पुढे वळवळ थांबली! ; भिम छाव्यांच्या आंदोलनाची अखेर प्रशासनाकडून दखल!

केज/प्रतिनिधी .-केज शहरासह ग्रामीण भागातील थकित विज देयेकाची सक्तीनी वसुली करून महावितरण विभागात दबंग म्हणुन नाव केलेल्या महिला अधिकारी यांचा खरा चेहरा जनतेसमोर आणण्यासाठी दलित कार्यकर्ते रस्तावर उतरले असून ज्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या घरात दिवा लावला ज्या बाबासाहेबांनी महिलांसाठी हिंदू कोड बिल पास करुन महिलांना हक्क,अधिकार मिळवून दिले त्याच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेकरांच्या घरात अंधार करण्याचे काम महिला अधिकारी श्रीमती शितल सय्यद यांनी केल्याने व स्वता:ला व्हिक्टोरीया समजणाऱ्या महावितरण विभागातील शितल सय्यद यांनी दलित कार्येकर्ते यांना अर्वाच्य आणि घाणेरड्या, अश्लिल भाषेत सोशल मिडिया वरुन पोष्ट केल्याने दलित कार्यकर्ते आक्रमक होत. केज तालुक्यातील सर्व दलित चळवळीतील नेते , व इतर पक्ष सामाजिक संघटना यांनी पुढे येत एक झलक म्हणुन नुकतेच केज तहसिल कार्यालया समोर एक दिवशीय धरणे अंदोलन केले. यामुळे या चळवळी पुढे वळवळ थांबली असून भिम छाव्यांच्या आंदोलनाची अखेर प्रशासनाकडून दखल घ्यावी लागली. तर महावितरणच्या महिला अधिकारी यांना सक्तिच्या रजेवर जाण्याचे वरिष्ठांनी आदेश दिले आहेत.

तसेच येत्या चार दिवसांत महिला कनिष्ठ अभियंता यांचेवर निलंबनाची कार्यवाही होणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. तर महावितरण कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर सुरु करण्यात आलेले आंदोलन कार्यकर्त्यांनी तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतले आहे. जर प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानुसार चार दिवसात संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर निलंबनाची कारवाई न केल्यास तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा प्रशासनाला दिला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज येथील महावितरण कार्यालयाच्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शीतल सय्यद या स्वतः च्या फायद्यासाठी गुत्तेदाराशी संगणमत करून गुतेदाराकडून पैसे घेऊन शासनाची लाखो रुपयांची वीज चोरी करण्यास गुत्तेदारास सहकार्य करणाऱ्या व नाहक नागरिकांना वेठीस धरून केजची सतत नाहक बदनामी करून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या आणि कर्मचाऱ्यांना वेटठीस धरून आत्महत्या करण्यास मजबूर करणाऱ्या बेरजबाबदार कनिष्ठ अभियंता श्रीमती शीतल सय्यद यांचे तात्काळ निलंबन करून सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. यासह विविध मागण्या संदर्भात दिनांक २७ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांच्यासह



कार्यकारी अभियंता, आंबेजोगाई यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी यांना बहुजन विकास मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष लखन हजारे यांनी लेखी निवेदन देऊन संबंधित महिला कनिष्ठ अभियंता यांचे तात्काळ निलंबन करून कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. अशी मागणी केली असता महावितरण कार्यालयाकडून त्यांच्या मागणीची कसल्याच प्रकारची दखल घेण्यात आली नाही. म्हणून बुधवार दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी केज तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन,निदर्शने केज तालुका सर्व सामाजिक संघटना,पक्ष, त्रस्त झालेले ग्राहक व नागरिक यांनी केले. लखन हजारे यांच्या सह त्यांच्या सहकाऱ्यांच्या या आंदोलनाला विविध सामाजिक संघटना व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्राहक, नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होऊन प्रत्यक्षात उपस्थित राहून लेखी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे, महावितरण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या विरोधातील या आंदोलनाला केज वासियांसह तालुक्यातून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला आहे, या आंदोलनाची सर्वत्र चर्चा होत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

दिनांक २७ मार्च२०२६ रोजी दिलेल्या निवेदनात संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर मोठमोठे आरोप करण्यात आले होते. त्याचबरोबर सदर आंदोलनाची व या दरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यकारी अभियंता यांची व त्यांच्या कार्यालयाची राहील असे नमूद करण्यात आले होते.

बुधवार रोजी दुपारनंतर पाऊस सुरू होता.तरी देखील भर पावसात भीमसैनिक हे आंदोलनावर ठाम होते. या पावसात एक अपंग आंदोलक यांना चक्कर येऊन ते बेशुद्ध अवस्थेत पडले होते. रुग्णवाहिकेला आंदोलन स्थळी प्राचारण करून त्यांना तात्काळ केज उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचार घेतल्यानंतर अपंग आंदोलक हे घरी न जाता आंदोलन स्थळी येऊन आंदोलनावर ठाम राहिले.

या आंदोलनाचे गांभीर्य व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचे संकेत ओळखून केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी महावितरण कार्यालयांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भ्रमण ध्वनी वरून माहिती देऊन महावितरण कार्यालयांचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री.संदीप चाटे व सहाय्यक व्यवस्थापक श्री.शेख साहेब यांना केज तहसील कार्यालयात येथे अवगत केले. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. म्हणून केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे स्वतः आपल्या कर्मचाऱ्यासह मोठा फौज फाटा घेऊन तळ ठोकून होते.

दुपारी नंतर महावितरणचे अधिकारी हे आंदोलन स्थळी न आल्यामुळे आंदोलक हे आक्रमक झाल्याची माहिती मिळताच नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारूणभाई इनामदार हे आंदोलन स्थळी दाखल होऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून आंदोलकांच्या मागण्या जाणून घेऊन त्यांना शासनास सहकार्य करण्याची विनंती केली. आंदोलनाची परिस्थिती आवाकाच्या बाहेर जाऊ नये. व कायदा सुव्यवस्था बिघडू नये म्हणून केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी प्रशासना समवेत चर्चा करून आंदोलकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासनास विनंती करून आंदोलकांच्या मागण्यावर ठामपणे राहुन संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यावर लेखी निवेदना च्या मागणी अनुसार चार दिवसात निलंबनाची कार्यवाही करण्याचे कार्यकारी अभियंता श्री.मनीष डाकरे यांच्या स्वाक्षरीचे पत्र घेऊन अतिरिक्त कार्यकारी अभियंता संदीप चाटे, सहाय्यक व्यवस्थापक श्री शेख, ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, उपअभियंता श्री. सय्यद साहेब, कनिष्ठ अभियंता श्री अंडिल साहेब यांनी तहसीलदार राकेश गिड्डे व पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन कर्त्यांना विनंती करून आंदोलनापासून प्रवृत्त केले.तर

तहसीलदार राकेश गिड्डे व पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी आंदोलनाचे गांभीर्य ओळखून परिस्थिती हाताळल्यामुळे व ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मध्यस्थी मुळे मोठा अनर्थ टळला आहे.

# केज बसस्थानकातून महिलेचे मंगळसूत्र लांबपास करणाऱ्या महिला आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने घेतले ताब्यात

केज/प्रतिनिधी.-केज बसस्थानकातून महिलेचे मंगळसूत्र लांमपास करणाऱ्या महिला आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे कारवाईचे सत्र चालू आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज पोलीस ठाणे येथे फिर्यादी मंजुश्री हरीराम जगदाळे रा.फुलेनगर केज यांनी फिर्यादी होती की, मंजुश्री जगदाळे या दिनांक १९ मार्च २०२६ रोजी केज बसस्थानक येथे लातूरकडे जाणाऱ्या एसटीची वाट पाहत होत्या. नाशिक-लातूर बस मध्ये चढत असताना गर्दीमध्ये मंजुश्री जगदाळे यांच्या गळ्यातील मिनी गंठण ज्याचे वजन ९.५ ग्रॅम हे अज्ञात चोरट्याने चोरून घेऊन गेले अशा वर्णनाच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१६९/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड हे करीत होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने घटना स्थळास भेट दिली. सदर घटनेच्या दिवशीचे सीसीटीव्ही



फुटेज प्राप्त केले असता एक संशयित महिलाही फिर्यादी यांच्या पाठीमागे उभे असल्याचे दिसले व काही वेळात सदर महिला बस मध्ये न चढता बस स्थानकातून बाहेर निघून जाताना दिसून आली.

सदरची हालचाल संशयापद वाटल्याने सदर महिलेचा शोध स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होते. दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी सदर महिलेचा शोध घेत असताना पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदर सीसीटीव्ही फुटेज मधील महिलाही माऊली नगर बीड येथील रहिवाशी असून ती घरी हजर आहे. सदर मिळालेल्या माहितीवरून त्या महिलेच्या घरी जाऊन तिला ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केली असता सदरचा गुन्हा त्या महिलेने केला असल्याचे कबूल केले. त्या महिलेच्या ताब्यातून चोरून घेऊन गेलेले ९.५ ग्रॅम वजनाचे मिनी गंठण घ्यायची किंमत १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे मिनी गंठण सोने जप्त करून त्या महिला आरोपीला केज पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे सदर महिला ही बस स्थानकामध्ये सवारी करण्याच्या सवयीची असून तिच्या विरोधात पोलीस स्टेशनला गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार महेश जोगदंड, पोलीस हवालदार जफर पठाण, पोलीस हवालदार दिलीप गीते, पोलीस हवालदार स्वाती मुंडे, चालक पोलीस हवालदार गणेश मराठे यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.